# प्रकरण दुसरे

१) मित्रमेळा आणि अभिनव भारत -

२) सावरकरांच्या राष्ट्रवादाचे त्यांच्या कवितेतून दिसणारे रूप -

# प्रकरण दुसरे

## (१) मित्रमेळा आणि अभिनव भारत

सावरकरांनी मित्रमेळा आणि अभिनव भारत या संस्थाद्वारे लोकात राजकीय जागृती घडवून आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर बालपणातच राष्ट्रवादी विचारांचे संस्कार झाले होते. इंग्रजांच्या अन्यायी, दडपशाही राजवटीतून भारताची मुक्तता करण्यासाठी त्यांनी भारताचे संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य मिळविणे हे आपले ध्येय मानले. आणि ध्येय साध्य करण्यासाठी सशस्त्र क्रांतीवादी विचारांचा स्वीकार केला. त्यासाठी त्यांनी आपले सहकारी मित्र श्री. म्हसकर, श्री पागे यांच्या सहकार्याने नोव्हेंबर, १८९९ मध्ये "राष्ट्रभक्त समुह" नावाची गुप्त संस्था नाशिक येथे स्थापन केली. या गुप्त संस्थेचे ध्येय हिंदुस्थान इंग्रजांच्या पारतंत्र्यातून संपूर्णपणे स्वतंत्र करणे हे होते. त्यासाठी अर्ज विनंत्यापासून ते सशस्त्र क्रांतीपर्यंत सर्व शक्य आणि उपयुक्त अशी साधने वापरण्याचे तिचे मार्ग होते. आपले हेच सशस्त्र क्रांतीचे राष्ट्रवादी तत्वज्ञान सांगताना सावरकर म्हणतात, "शस्त्राशिवाय केवळ नि:शस्त्र मार्गाने राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळणे शक्य नाही. त्यासाठी क्रांतीकारी गुप्तसंस्था स्थापन केल्या पाहिजेत. त्यांचे प्रचारक आणि आचारक असे दोन भाग पाडले पाहिजेत. आणि गनिमीकावा युध्दाच्या रणनीतीने शत्रूच्या केंद्रावर आणि अधिकाऱ्यावर छापे घालून, साधेल तशी कापाकापी करून, शत्रूच्या सैन्यातील स्वकीय सैनिकांना क्रांतीप्रवण करून वेळोवेळी उठाव करून, क्रांतीयुध्दाने स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न केला पाहिजे. [१]

या गुप्तमंडळात नवीन विश्वासू तरुणांची भरती करण्यासाठी आणि राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी एक व्यापक आणि प्रकट स्वतंत्र संस्था असावी असे

गुप्तमंडळातील सदस्यांना वाढू लागल्याने, सावरकरांनी १ जानेवारी, १९०० रोजी नाशिक येथे मित्रमेळा ही प्रकट संस्था स्थापन केली. "मित्रमेळा" या संस्थेची बैठक दर शनिवारी व रविवारी घेण्यात येत असे. बैठकीत शिवाजी महाराज, मॅझिनी, रामदास, वासुदेव बळवंत फडके, झाशीची राणी, चाफेकर बंधू यांची चरित्रे वाचली जात. व्याख्याने, पुस्तके आणि गाणी याद्वारे लोकांना राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शिक्षण दिले पाहिजे. तसेच शस्त्रे आणि दारू गोळा जमवून सरकारविरुध्द बंडाची तयारी केली पाहिजे, असे क्रांतीवादी विचार सावरकर बैठकीत मांडीत. मित्रमेळ्याच्या बैठकीत काही विषयांची नियमीतपणे चर्चा होत. सावरकर त्या चर्चेचा संबंध राजकारणाशी अकस्मात जुळवीत आणि म्हणत, एखादा कायदा वाईट आहे, तो बदला, हा कर जाचक आहे, तो काढा, अशी किरकोळ रडवी गा-हाणी किती दिवस करावयाची ? विषारी झाडाची पाने कोठपर्यंत खुडत बसावयाची ? तेव्हा त्याच्या मुळावरच घाव घातल्याशिवाय तो वृक्ष नष्ट होणार नाही. मग कधीतरी तो घाव घालावाच लागणार. म्हणून त्याची सुरूवात आजच का करू नये ? जो कोणी घाव घालण्यास सुरूवात करील त्यास आपल्या प्राणाची किंमत द्यावीच लागणार. तेव्हा त्याची सुरूवात आजच करून आपणच ती प्राणदानाची किंमत का देवू नये ? या विषारी वृक्षाची पाने तेवढी वाईट आहेत, ती खुडली पाहिजेत, मुळाशी आमचा काही वाद नाही, असे म्हणणे ही राष्ट्रीय पक्षाची चूक आहे. तसेच त्या वृक्षाला न दुखविता फक्त प्रार्थनांचे ओशाट दूध घालीत राहिलो तर तो आपण होवून अमृतवृक्षात रूपांतरीत होईल असे म्हणणा-या नेमस्तांचीही चुक आहे. या दोन्हीही चुका सारख्याच बुध्दिभ्रष्ट आहेत. म्हणून त्या आपण सुधारल्या पाहिजेत. त्यांना शक्य नाही ते आपण शक्य करू या. कारण तो पारतंत्र्याचा विषारी वृक्ष सुधारण्याचा एक मार्ग आहे, तो

म्हणजे, तो वृक्ष मुळातून उपटून काढणे हा होय. त्या विषारी वृक्षांच्या मुळाशीच आमचे खरे भांडण आहे. म्हणून इंग्रजांचा अधिकारी वर्गच न नव्हेतर इंग्रजी सत्ताच उलथून टाकली पाहिजे आणि ही गोष्ट स्पष्टपणे ज्वालाग्राही भाषेत, बंदीगृहाच्या छप्परावरून आणि फाशीच्या खांबावरून गर्जत राहिल्याशिवाय लोकांची हीन व उपेक्षा वृत्ती नष्ट होवून ते कधीही उठणार नाहीत. सशस्त्र क्रांतीच्या मार्गानेच राष्ट्रीय स्वातंत्र्य मिळेल असे क्रांतीवादी राष्ट्रवादी विचार सावरकर या बैठकीत मांडीत. [२]

भारतीय लोकांत राजकीय स्वातंत्र्याची जागृती व्हावी यासाठी सावरकर बैठकीत म्हणत की, कोणात्यातरी अत्युच्च, अतिभव्य, अतिदिव्य ध्येयास त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या डोळ्यासमोर धरल्याशिवाय लोकांची मने आकर्षित होणार नाहीत. वैयक्तिक संसाराच्या चाकोरीतून बेभान दिव्य प्रेरणेशिवाय ते बाहेर येणार नाहीत. स्वातंत्र्याच्या महान ध्येयाच्या प्रेमाने उन्मत झाल्याशिवाय ते उसळून उठणार नाहीत. आज हा धाडसी आरंभ केला तर समजा शंभर वर्षांनी ते महान कार्य यशस्वी होईल. परंतु आरंभ उद्यावर ढकलाल, जितका उशीर कराल, तितकेच यशही दुरावत जाईल. यासाठी निर्भेळ आणि संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच आमचे मुख्य ध्येय होय. या राजकीय पारतंत्र्याचा बट्टा नावालादेखील आमच्या नाण्यांवर रहाता कामा नये. स्वदेश स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय, आमचा राजकीय देव, आमची ऐहिक उन्नती, हाच आमचा मोक्ष होय. संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हेच आमचे ध्येय असल्याने त्याची साधना सशस्त्र क्रांतीशिवाय दुसरी कोणती असणार ? ना. गोखले प्रभृति नेमस्तांच्या विनंती, याचना, अर्ज यांनी काही नोकऱ्या देण्यात येतील परंतु स्वामित्व नाही, टिळक प्रभृती राष्ट्रीयांच्या निषेध, स्वदेशी, असंतोष, बंदीवास यांनी काही अधिकार देण्यात येतील. परंतु ते अधिकार देण्याचीच

मूळ सत्ता मिळणार नाही. म्हणून या दोन्हीनांही पायऱ्या करून, त्यावर चढून ती सशास्त्र क्रांतीची तलवार उपसल्याशिवाय ते स्वातंत्र्य, ते सिंहासन, तो मुकुट मिळणार नाही. यासाठी नेमस्त आणि राष्ट्रीय यांना जे करावयाचे आहे ते करू दिले पाहिजे. परंतु त्यांना जे करता येत नाही ते आपण केले पाहिजे. अर्थात स्वातंत्र्य हेच साध्य सशास्त्र क्रांती हेच साधन मानले पाहिजे. असे राष्ट्रीय स्वातंत्र्याविषयी क्रांतीनिष्ठ राष्ट्रवादी विचार सावरकरांनी मित्रमेळ्याच्या बैठकीत मांडले.[3]

मित्रमेळ्याच्या वतीने नाशिकला शिवाजी महाराजांचा उत्सव मोठ्या स्वरूपात साजरा करण्यात आला. त्यावेळी लोकांत राजकीय स्वातंत्र्याची भावना जागृत व्हावी म्हणून सावरकरांनी एक भाषण केले. त्या भाषणात सावरकर म्हणाले, "आम्ही हा उत्सव राजकीय हेतूनेच साजरा करीत आहोत. किंबहुना जे शिवाजी महाराजांप्रमाणेच आपल्या या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी लढण्यास तयार आहेत त्यानांच हा उत्सव साजरा करण्याचा अधिकार आहे. इंग्रजांच्या राजकीय गुलामगिरीच्या बेड्या तोडून स्वदेशाला स्वतंत्र करण्याची प्रेरणा आम्हाला मिळावी हाच या उत्सवाचा मुख्य उद्देश आहे. जर पारतंत्र्यात समाधानाने रहाणे, केवळ भारी पगाराच्या जागा मिळविणे, परदास्याचे पट्टेवाले होणे, हा कर हलका व्हावा, तो निर्बंध ढिला व्हावा एवढेच मर्यादीत ध्येय असेल तर त्या ध्येयास शिवाजीचा उत्सव सुसंगत होणार नाही. तर त्या ध्येयास शेवटच्या बाजीरावाचा उत्सव अधिक सुसंगत होईल. इंग्रज सत्तेविरूद्द आमचे काही म्हणणे नाही, केवळ आम्हांस पेन्शाने हवीत, पोटभर खावयास हवे, सवलती हव्यात इतकीच मर्यादीत ज्यांची महत्त्वाकांक्षा आहे, तसेच पारतंत्र्याशी राजनिष्ठ असणाऱ्यांना पावला तर ब्रम्हावर्ताचा शेवटचा बाजीराव पावेल,

रायगडचा शिवाजी पावणार नाही. कारण शिवाजी स्वातंत्र्याची देवता आहे. म्हणून आम्ही तिचे स्वातंत्र्यासाठी आवाहन करतो की, ती आमच्या अंगात संचारून आम्हांला स्वदेश स्वातंत्र्याच्या कार्यात लढण्याची आणि जिंकण्याची शक्ती मिळावी, परिस्थितीप्रमाणे साधने बदलतील, पण स्वातंत्र्य हेच साध्य, बाण बदलतील पण लक्ष्य तेच असेल. अशा अर्थाने अत्यंत प्रेरणादायक राष्ट्रवादी विचार सावरकरांनी या भाषणात मांडले. [४]

राजा इंग्लंडचा की हिंदुस्थानचा ?

मित्रमेळ्यात खडाजंगी वाद !

इंग्लंडची राणी व्हिक्टोरिया वारल्यामुळे हिंदुस्थानात सर्वत्र शोक सभांची गर्दी सुरु झाली. राष्ट्रीय वृत्तपत्रांतूनही या निमित्त राजनिष्ठा व्यक्त करण्याची स्पर्धा सुरु झाली. कारण प्रतिज्ञाच अशी होती की, इंग्रजांचे राज्य हिंदुस्थानावर असावे हा वाद नाही, म्हणजे आमचे राजा-विरूद्ध काहीही भांडण नसून, आम्ही इंग्लंडच्या राजाची इंग्रजांप्रमाणेच राजनिष्ठ प्रजा आहे. आमचे भांडण केवळ त्यांच्या येथे असलेल्या वाईट अधिकाऱ्यांशी आणि राज्यपद्धतीशी आहे. अधिकारी बदलून चांगले आले तर आम्ही त्यांचा गौरव लॉर्ड रिपनप्रमाणे करु. अशा या राजकीय प्रगती-च्या अवनत अवस्थेत राणी व्हिक्टोरिया वारताच तिची एखाद्या देवीपेक्षाही जास्त स्तुति देशभर सुरु झाली आणि नवीन राजा एडवर्डच्या पायावर लोक मानसिक लोटांगणे घालू लागले. राणीची आणि नव्या राजाची जास्तीत जास्त स्तुति करून, आणि आपली राजनिष्ठा व्यक्त करून आपल्यावरील सरकारचा मागचा राग कमी करण्याचे प्रयत्न सुरु झाले. अशाच परिस्थितीत मित्रमेळ्यातील एक प्रमुख श्री.म्हसकर यांनी मित्रमेळ्यावरील पोलीसांचा डोळा चुकविण्यासाठी मित्रमेळ्याने राजनिष्ठेचे धोरण स्वीकारावे असा बेत आखला.

आणि संस्थेच्या हितासाठी आपण उघडपणे काहीतरी राजनिष्ठेचे सोंग करावे असे मत मांडले. आपण ज्या प्रमाणे मित्रमेळ्याच्या वतीने गणेशोत्सव, शिवोत्सव आणि राजकीय चळवळीच्या सभा करतो त्याप्रमाणेच राणी व्हिक्टोरिया वारल्याची एक दु:खप्रदर्शनार्थ शोक सभा घेवून, त्या सभेतच नवीन राजे एडवर्ड यांच्याशी आम्ही राजनिष्ठ असल्याचा एक ठराव करून टाकावा, म्हणजे इतर राजकीय चळवळीत आपण वाटेल तितकी कडक भाषा वापरीत असलो तरी आमचा राजाशी काही वाद नाही, आमची राज्यपद्धती सुधारावी हाच वाद आहे, इंग्रजांचे राज्यच नको असा आमचा वाद नाही. असे केल्याने आपली संस्था जास्त दिवस टिकेल आणि उपयुक्त कामे करील अशी इंग्रज राजनिष्ठेची योजना त्यांनी आखली. [5]

परंतु इंग्रज राजनिष्ठ योजनेला सावरकरांनी हिंदी राष्ट्रवादी दृष्टिकोणातून कडाडून विरोध केला आणि राजा इंग्लंडचा की हिंदुस्थानचा ? या बाबत आपले राष्ट्रवादी विचार मांडले. सावरकर त्याबाबत म्हणतात, "श्री म्हसकर राजनिष्ठेचे केवळ सोंग म्हणूनच ही सभा घेऊ असे म्हणत असले-तरी ते आपल्यासारखेच, इंग्लंडचा राजा हा हिंदुस्थानचा राजा नाही या मताचेच आहेत. त्यांच्या या मतांत बदल झाली नाही ही आनंदाचीच गोष्ट आहे. तेव्हा ही सभा एक राजनीतीचा डाव म्हणून करावी की करू नये हाच प्रश्न आहे. राजनीतीचे डाव प्रसंगी खेळलेच पाहिलेत, परंतु गुप्त संस्था म्हणजे एक राजनीतीचा डावच आहे. शिवाजीने वेळ प्रसंगी औरंगजेबालाही शरणागतीची पत्रे लिहिली. कृष्णाही उघडपणे कंसाला मारण्यास मथुरेला आला नाही. त्याप्रमाणेच प्रसंगी आपणाही राजनिष्ठेचे सोंग करू. परंतु आज तो प्रसंग आहे काय ? जेव्हा आपण शत्रूला फसविण्यासाठी एखादी वरकरणी माया दाखवितो तेव्हा आपण असे पाहिले पाहिजे की, त्या फसविण्याच्या डावाने शत्रू पक्षा फसणार की आपणच फसणार ? एकंदरीत त्या डावामुळे

आपल्या पेक्षा शत्रूच असणार असेल तर असे राजनिष्ठेचे शाब्दिक सोंग करणे योग्य ठरेल. परंतु आपल्यावर तसा कोणताही प्रसंग आलेला नाही. राजनिष्ठेची ही सभा वा व्हिक्टोरियाचा शोक करण्यास इंग्रज निर्बंधा-प्रमाणे आपण बांधील नाही. मग टाळता येणारे असूनही असे राष्ट्रीय पाप मुद्दामच का करा ? इंग्रजांना भर सभेत राजे म्हणावयाचे ? जोपर्यंत हिंदुस्थानात त्यांचे बलात्कारी राज्य आहे तोपर्यंत एका प्रचंड सशस्त्र दरोड्यातून त्याला नैतिक निष्ठेचा थोडाही पाठींबा असू शकत नाही. ते राज्य करण्यात भाग घेणारा प्रत्येक इंग्रज चोर आहे आणि दंडनीय आहे. तो राजा असेल तर इंग्रजांचा, आमचा नाही. म्हणून त्यांनी पाहिजे तर रडावे. व्हिक्टोरिया व्यक्तिशः चांगली होती इतकेच म्हणून ठराव करावा असे म्हसकर म्हणतात. परंतु ती मेली त्या दिवशीच किती तरी अशा चांगल्या बायाबापड्या मेल्या. त्यांचा उल्लेख का होत नाही ? हे सर्व ढोंग आहे, ती राणी होती म्हणूनच ही सभा तुम्ही करणार ? ती आमची राणीच नव्हती, उलट तिच्या कारकिर्दीत हिंदुस्थानचे प्रांता-मागून प्रांत इंग्रजांनी गिळले, तिने गिळविले, आणि थापेबाजीचे ते चिटोरे, तो सत्तावनचा जाहिरनामा, ज्याला दुधखुळे राजकारण "सनद" म्हणते ते प्रसिध्द करून आपण त्या दुष्ट लुटीची स्वामिनी बनली. एक कवडी तरी तिने परत दिली का ? नेला कोहिनूरी राजमुकुट आणि मुल्य म्हणून दिले ते जाहिरनाम्याचे चिटोरे, एवढी साध्वी होती तर सत्तावनच्या क्रांतीयुध्दात लाखो भारतीयांच्या रक्ताने भरलेला मुकूट तिने हसत हसत स्वतःच्या डोक्या-वर का ठेवला ? इंग्रजांच्या कोणत्या एखाद्या तरी राक्षसी नीतीला तिने दोष दिला आहे का ? इंग्रजी दुष्टाईचे दायित्व तिच्यावर नाही असे म्हणाल. कारण ती बुध्दिबळातील राणी होती. तर मग दुष्टाईचे दायित्व तिचे कसे असेल ? तेव्हा राजा काय आणि राणी काय, ती इंग्रजांचीच आहे. म्हणजेच आमच्या शत्रूचीच राणी आहे. म्हणजेच

आमच्या या राष्ट्रावर तुटून पडलेल्या दरोडेखोरांचा सरदार, त्याच्याशी म्हणे राजनिष्ठा व्यक्त करा. उलट मित्रमेळ्याला विशिष्ट कर्तव्य करुन दाखविण्याची हीच वेळ आहे. संपूर्ण देश राणी मोठी चांगली म्हणून राजनिष्ठेच्या मूर्ख स्तुतिपाठात बुडाला असता, आपण घरोघरी जाऊन सांगू कसली राणी ? कसली राजनिष्ठा ? ही राजनिष्ठा नव्हे, ती गुलामगिरीची गीता आहे. आमचा राजा आमचा देश आहे. आम्ही दुसरा राजबिजा जाणत नाही. [६]

अशा प्रकारे हे तेजस्वी सत्य सांगणारी एक तरी संस्था या प्रसंगी आहे हे सिध्द करण्याचे भाग्य आपल्या संस्थेला लाभत असेल तर ते आपण निष्कारण भेकडपणाने का दुर सारावे ? यासाठी या संस्थेला मृत्यू आलाच तर तिचे जीवन सफल होईल. मोठे अगदी तोलून-मोलून लिहिणारे देशभक्तही इंग्रजांच्या मनात येताच तुरुंगात दडपले जातातच की नाही ? मग आता स्पष्ट काय ते बोलून टाकू या. क्षणापुरता जरी तो आपण तोलू शकलो आणि दुसऱ्याच क्षणी शत्रूच्या गोळीने ठार होऊन चित्तेत पडलो तरी चिंता नाही. कारण मेलेल्यांची चित्ता पेटताच तिच्या आगीने आग भडकते, आणि अशाच एखाद्या भडकलेल्या आगीचा वणवा होऊन परसत्तेचा राजवाडा त्यात जळून खाक होतो. अशा प्रयत्नांस फाशीची शिक्षा असते म्हणून बजावता ? ते आम्हांस माहीत आहे, चाफेकरांच्या फाशीतून आम्ही जन्मलो, आमची फाशी आणखी कोणास जन्म देईल आणि हा वंश राखील. फार दिवस जगून पक्व काळी जे देशहित साधावयचे ते हे लक्षावधी म्हातारे , कोतारे, बायाबापडया जगून साधतच आहेत. आता अकाली मरणारांचे मरण काय साधते आहे ते पाहण्याचे उरले आहे. फाशीवर अकाली मरतात आणि या प्लेगात ? दुष्काळात ? महामारीत ? म्हणून

स्वातंत्र्यासाठी आम्हास प्राणाची भीती नाही. प्राण की स्वातंत्र्य ? हा प्रश्न आम्ही स्वत:स आधीच विचारून स्वातंत्र्य मिळविण्याचे ठरविले आहे. तेव्हा प्राण गेला तरी बेहत्तर पण स्वातंत्र्य ही शपथ घेऊनच येथे आपण पाय ठेवला नाही का ? [७]

प्रस्तुतचे राष्ट्रीय पुढारी म्हणतात, आमचा राजाशी वाद नाही. राज्यपध्दती आणि अधिकारी तेवढे चांगले असले की झाले. परंतु त्यामुळे लाखो लोकांची खरोखरच तशी भ्रामक समजूत होत आहे. म्हणून आपण स्पष्टपणे घोषीत करू या की, "आमचा राजाशीच मुख्य वाद आहे. देवदूत जरी अधिकारी म्हणून पाठवाल आणि प्रसंगी जिलेबी फुकट चाराल तरीही हे युध्द आम्ही थांबविणार नाही. कारण आम्हांस तुमचे राज्यच नको आहे. तुमचा राजेपणा नको आहे. आम्हांस स्वत:लाच राजा व्हावयाचे आहे. आमचा देश हाच आमचा राजा आहे. बाकी सगळे चोर आहेत. [८]

अशाप्रकारे मित्रमेळ्याच्या खडाजंगी बैठकीत सावरकरांनी सशस्त्र क्रांतीवादी राष्ट्रवादी विचार मांडले.

सावरकर माईला सासरी पोचविण्यासाठी त्रिंबकला गेले होते. तेव्हा तेथे सरकारी आणि निमसरकारी अधिका-यांनी स्वत: पुढारीपणा घेऊन राजे एडवर्ड यांचा राजनिष्ठाप्रदर्शक उत्सव करण्याचा बेत केला होता. या उत्सा- वाला सुरुवातीपासूनच मित्रमेळ्याचा विरोध सुरु होता. सावरकर आणि अण्णा फडके यांनी उत्सवाला विरोध करण्यासाठी रातोरात लिहून गावा- तील भिंतीवर पत्रके लावली. त्या पत्रकात सावरकरांनी राष्ट्रवादी दृष्टीने लोकांना आवाहन केले की, "तुमची राष्ट्रमाता ज्याने बटीक केली, त्या

राजाचा उत्सव करणे म्हणजेच तुमची स्वतंत्रता ज्या दिवशी मेली त्या काळ्यादिनाचा वाढ दिवस करणे होय. परराज्याशी राजनिष्ठा ठेवणे म्हणजेच स्वराज्याशी द्रोह करणे होय. [९]

या वातावरणातही त्र्यंबकला राजाचा उत्सव साजरा करण्यात आला. तेव्हा त्याच्या अतिउत्साही अध्यक्षांनी म्हटले की, "एडवर्ड राजे हे आपले खरोखरच बाप आहेत" या त्याच्या लाचारीच्या उद्गाराचा राष्ट्रवाद्यांना राग आला तेव्हा सावरकर आणि अण्णा फडके यांनी त्या उद्गाराची परिणाम दाखविणारी पत्रके गुपचूप गावातील भिंतीवर लावली. त्यात त्यांनी या अध्यक्षाला एकच खोचक प्रश्न विचारला, तो म्हणजे "एडवर्ड राजे जर आपले खरोखरच बाप असतील तर आपले वडील आपल्या मातोश्रींचे कोण आहेत ? अशा प्रकारे सावरकरांनी भित्तीपत्रकातूनही राष्ट्रवादी विचार मांडले. [१०]

सन १९०४ मध्ये सावरकरांनी मित्रमेळ्याच्या सदस्यांच्या उपस्थितीत नाशिकला मित्रमेळ्याचे "अभिनव भारत" या संस्थेत रूपांतर केले. या प्रसंगी केलेल्या भाषणात ते म्हणाले, "आपली ही संस्था मॅझिनीच्या "तरुण इटली" संस्थेच्या धर्तीवर आपण काढीत आहोत आणि आपल्या मातृभूमीच्या दास्यविमोचनासाठी सशस्त्र क्रांती करण्याचा निर्धार करीत आहोत. "आपल्याला इंग्रजांचा पराभव करण्यासाठी समानशत्रूमित्र संधीचा उपयोग करून घेऊन इंग्रजांच्या शत्रूशी तात्पुरती का होईना मंत्री जोडली पाहिजे. असे राष्ट्रवादी विचार मांडून सावरकरांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी लढण्यास तरुणांना संघटीत केले. [११]

सन १९०५ मध्ये "अभिनव भारत" संस्थेची वार्षिक बैठक कोठूर येथे झाली. तेव्हा या बैठकीत सावरकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी तरुणांना

आवाहन केले की, देशासाठी मरा आणि आपले स्वराज्य परत मिळवा., स्वदेश स्वातंत्र्यासाठी आपण सशस्त्र झालो आणि तळवारीला तलवार भिडवली तर त्यात कोणतेही पाप नाही. जोपर्यंत आपल्या तलवारीवर स्वधर्म आणि स्वदेश हे शब्द कोरलेले असतील तोपर्यंत त्या तलवारीवर पडणारा प्रत्येक बळी म्हणजे स्वातंत्र्य यज्ञामध्ये पडणारी आहुती होय. ती आहूती पापमय नसून पुण्यमय आहे. [१२]

२३ फेब्रुवारी १९०६ रोजी पुण्याला जोशी हॉलमध्ये विद्यार्थ्यांची एक सभा भरली. या सभेत सावरकरांनी राष्ट्रीय स्वातंत्र्य लढयास प्रेरणा देणारे राष्ट्रवादी विचारांचे भाषण केले. त्या भाषणात सावरकर म्हणाले, देशातील लोकांची स्थिती फार शोचनीय झालेली आहे. लोकांना खावयास अन्न नाही, त्यांना दुष्काळाला तोंड देता येत नाही. त्यामुळे त्यांची सर्व जबाबदारी आता आपल्यावरच आहे. आपला देश या शोचनीय स्थितीत राहणे आता शक्यच नाही. तुम्ही चिखलात रुतून बसलाअ आहात, त्यातून बाहेर पडण्यासाठी शक्ती पाहिजे. वृध्द लोक या कामी निरुपयोगी आहेत. परंतु त्यांचा सल्ला मात्र मौल्यवान ठरेल. पण नवीन पिढीच्या तरुणातच आपल्या आशाआकांक्षा केंद्रीत येऊन राहिलेल्या आहेत. त्यांना चांगली शिकवण मिळाली तर हेच तरुण राष्ट्राचे आधार ठरतील. मॅझिनी म्हातारा होता, परंतु त्याचे अनुयायी तरुण होते. त्यांनी त्याचा उपदेश ऐकला. त्याने तरुणांना क्रांतीचे काम दिले ते काम त्या तरुणांनी ~~यशस्वी~~ यशस्वी केले. यानंतर सावरकर ज्वलंत क्रांतीकारक तन्मयतेने म्हणाले, "स्वातंत्र्यदेवीला ताज्या फुलांचा हार पाहिजे असतो. वृध्द लोक शिळी झालेली फुले होत. ताज्या फुलांना फार चांगला सुवास येतो. तरुण लोक म्हणजे ताजी फुलेच आहेत आणि ती स्वातंत्र्यदेवीला आवडतात. त्यांनी

एक व्हावे आणि एकीचा पुष्पहार तिला अर्पण करावा यासाठी तरुणांनी अश्रू गाळीत बसू नये, तर जे गमावले आहे ते आपण परत मिळविण्यासाठी आपल्या रक्ताचे थेंब सांडले पाहिजेत. राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी क्रांती युध्द करण्याची प्रेरणा तरुणांना देताना सावरकरांनी समर्थ रामदासांची शिकवण आचारणात आणण्याचा संदेश दिला. त्या संदेशात सावरकर म्हणतात, अभिनव भारताच्या तरुणांनो, राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या एकाच विचाराने संघटना करा. या संघटनेतील लोकांची मने राष्ट्रीय विचाराने भारुन टाका आणि परकीयांवर तुटून पडा. हा संदेश देताना त्यांनी समर्थ रामदासांची मुळ ओवी म्हटली ती म्हणजे -

"बहूत लोक मिळवावे । एक विचारे भरावे ।
कष्ट करोनि घसरावे । म्लेंछावरी ।।

परंतु ही ओवी म्हणताना मोठ्या चातुर्याने ओवीतील अखेरचा शब्द येताच ते क्षणभर थांबले आणि त्यांच्या आवेशपूर्ण भाषणाशी निगडीत झालेल्या लोकांनीच "म्लेंधावरी" या शब्दाची गर्जना करुन ते मूळ वचन पूर्ण केले. [१३]

अशा प्रकारे राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी भारतीय लोकांत राजकीय जागृती व्हावी म्हणून सावरकरांनी "मित्रमेळा" आणि "अभिनव भारत" या संस्थाद्वारे सशस्त्र क्रांतीचे राष्ट्रवादी विचार मांडले.

......

## (२) सावरकरांच्या राष्ट्रावादाचे त्यांच्या कवितेतून दिसणारे रूप -

स्वा. वि.दा. सावरकर यांच्यावर बालवयातच राष्ट्रवादी विचारांचे संस्कार झाले होते. त्यांचे वडील दामोदरपंत हे धार्मिक वृत्तीचे होते. रामायण महाभारत यांतील उतारेच्या उतारे ते तोंडपाठ म्हणत असत. तसेच आपल्या मुलांना राणा प्रताप, शिवाजी महाराज आणि पेशवे यांच्या बखरी, पराक्रम, पोवाडे वाचून दाखवीत. त्याचप्रमाणे सावरकरांची आई रोज रात्री झोपण्यापूर्वी आपल्या थोरल्या मुलाकडून (बाबाराव) रामायण, महाभारत यातील काही अध्याय ओवीबध्द वाचून घेत. त्यामुळे राष्ट्रपुरुषांच्या वीरकथा, बखरी, पोवाडे, लोककथा, इतिहास कथा, पुराण कथा यांच्या प्रभावाने सावरकरांचे विचार राष्ट्रवादी बनण्यास सुरूवात झाले. पुढे शाळेत गेल्यानंतर त्यांना इतिहास आणि महाकाव्ये यातून राष्ट्रवादी विचारांची प्रेरणा मिळाली. त्यामुळे सावरकर मिळेल ते पुस्तक आणि वृत्तपत्र वाचून काढीत असत. या प्रेरणेतूनच त्यांनी राष्ट्रवादी विचारांच्या कविता, पोवाडे, करण्यास सुरूवात केली.[१४] त्यांच्या काही प्रमुख कविता आणि पोवाड्यातून त्यांचे राष्ट्रवादी विचार पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) स्वदेशीचा फटका :

सावरकरांनी "स्वदेशीचा फटका" ही कविता १८९८ मध्ये लिहिली. या काळात भारतात राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनास सुरूवात झालेली होती. त्यामुळे भारतीय लोकांत स्वदेशाची राष्ट्रवादी भावना रूजावी, तसेच त्यांनी राष्ट्रहितासाठी स्वहिताचा त्याग करून स्वदेशीचा वापर करावा. कारण स्वदेशी हे राष्ट्रीय आंदोलनाचे एक महत्त्वाचे अस्त्र आहे. ते अस्त्र स्वीकारून लोकांनी राष्ट्रीय आंदोलन करावे. तसेच राष्ट्रहितासाठी स्वदेशी

वापराची प्रेरणा लोकांना मिळावी म्हणून स्वा. सावरकरांनी "स्वदेशीचा फटका" ही कविता रचली. या कवितेच्या खालील ओळींतून सावरकरांचे राष्ट्रवादी विचार व्यक्त होतात.

आर्यबंधु हो उठा उठा का मठासारखे नटा सदा ।
हटा सोडूनी कटा करु या म्लेंच्छपटा ना धरु कदा ।
काश्मीराच्या शाली त्यजुनी अलपाकाला का भुलता ।
मलमल त्यजुनी वलवल चिती हलहलकें पट का वरिता ।।
असा सवाल करुन सावरकर म्हणतात —

द्रव्यखाणी ही खोरं घेऊनी परकी पोरें खणती रे ।
एकचित्त या करुं गड्यांनो, वित्त जिंकू ते पुनरपि रे ।।

असा निर्धार या फटक्यात करुन, स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांने केवळ स्वदेशीचाच वापर करण्याचा निश्चय केला पाहिजे, असे राष्ट्रवादी विचार या फटक्यात सावरकरांनी मांडले आहेत. [१५]

२) चापेकर - रानडे यांजवरील फटका :

सन १८ एप्रिल, १८९८ रोजी स्वदेशाच्या छळाचा सुड घेऊन चापेकर आणि रानडे देशासेवेसाठी अतुल धैर्याने फासावर चढले. या घटनेने सर्व देश दु:खाने कळवळला. अनेकांनी चापेकरांच्या या ह्रदयद्रावक अंतावर अश्रू गाळले. तेंव्हा सावरकर नाशिकला होते. चापेकर आणि रानडे यांनी देशासेवेसाठी केलेल्या प्राणबलीदानाने सावरकरांच्या मनात विचार आला की, "स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन चापेकर आणि रानडे मोठया धैर्याने फासावर चढले. त्यांच्या

प्राणज्योतीने जाता जाता चेतविलेली शत्रूंजय वृत्ती यज्ञकुण्डात समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकावीत नेणे असेल तर त्याचे दायित्व माझ्यावरही पडत आहे." कारण त्यांचा पराक्रम म्हणजे लोकांच्या रित्या हळहळीला त्यांनी जिवंत चळवळीचे स्वरूप दिले. अशी विचारनिश्चिती सावरकरांची झाली. त्यामुळे या विचाराने त्यांना असे वाटू लागले की, "चापेकरांचे कार्य कुणीतरी चालविणे इष्ट व अवश्य असेल तर ते कार्य मीच का चालवू नये ? तो होम मी का करू नये ? असा राष्ट्रवादी विचार करून त्यांनी आपल्या घरातील "अष्टभूजा" देवीपुढे भारतीय स्वातंत्र्याची शपथ घेतली की, "माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युध्दात शत्रूस मारीत मारीत चापेकरासारखा मरेन. किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकी स्वराज्याचा राज्याभिषेक करवीन । या पुढे मी माझ्या देशाचे स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतू उभारून मारिता मारिता मरेतो झुंजेन । [१६]

अशी शपथ घेऊन त्यांनी चापेकर आणि रानडे यांजवर १८९९ मध्ये फटका रचला. चापेकर आणि रानडे यांनी देशसेवेसाठी केलेल्या प्राणबली-दानाने भारतीय लोकांत राष्ट्रीय स्वातंत्र्याची भावना वाठीस लागावी, तसेच लोकांनी देशसेवेसाठी प्राण बलीदानाची तयारी ठेवावी यासाठी हा फटका १८९९ मध्ये त्यांनी रचला. या फटक्यातील खालील ओळींतून सावरकरांचे राष्ट्रवादी विचार व्यक्त होतात.

"स्वजन ठळाते ऐकुनि होती तप्त तरूण ते अरूण जणे ।
देशासाठी प्राण देती धन्य धन्य त्यां कां न म्हणे ?" ।।
शतावधी जे जन्मा येती मरोनि जाती ना गणती ।
देशासाठी मरती त्यांसी देशपिते की बुध म्हणती ।।
भक्ष्य रँड बहु मस्त देखाता सिंह धावला बगीकडे ।

गोळी सुटली, गडबड मिटली, दुष्ट नराधम चीत पडे ।।
फाशी ना ती यज्ञवेदिका रक्ते न्हाली जी तुमच्या ।
सांडुनी होवो त्याचि राष्ट्ररणीं सार्थक रक्ताचे अमुच्या ।।

चाफेकर, रानडे फाशीगेले, त्या दिवशी सावरकरांनी आपली शपथ पुनरुच्चारित केली. तीच या फटक्याच्या शेवटच्या ओळीत त्यांनी गुंफली आहे. या ओळींतून चाफेकर रानडे यांचे देशसेवेचे अपुरे राहिलेले कार्य आम्ही पुढे चालवू असे त्यांनी सांगितले आहे. ते म्हणतात की,

कार्य सोडुनी अपुरें पडला झुंजत, खंती नको । पुढे ।
कार्य चालवु गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे अम्ही धडे ।। [१७]

सावरकरांनी चाफेकर-रानडे यांजवरील फटका या कवितेत राष्ट्रवादी विचार मांडताना पारतंत्र्याची चीड, स्वातंत्र्य भक्तांचा आणि त्यांच्या शूर कृत्यांचा गौरव आणि त्यांचे क्रांतीकार्य स्वत: पुढे चालविण्याची शर्थ यासंबंधी विचार मांडले आहेत.

३) श्री शिवाजी महाराजांची आरती :

सावरकर महाविद्यालयीन शिक्षणासाठी पुण्याला फर्ग्युसन कॉलेज-मध्ये आले तेव्हा ते कॉलेजच्या वसतिगृहात राहिले. तेथे विद्यार्थ्यांच्या भोज-नाची व्यवस्था वेगवेगळ्या क्लबमध्ये केली होती. सावरकर चौथ्या क्लबचे सदस्य होते. त्या क्लबमध्ये छ. शिवाजी महाराजांचा फोटो लावलेला होता. तो फोटो पाहून सावरकरांच्या मनात राष्ट्रवादी विचार आले की, शिवाजी महाराजांनी स्वधर्म रक्षणासाठी स्वराज्याची स्थापना केली. म्हणून

शिवाजी महाराज हे राष्ट्रीय स्वातंत्र्याचे आराध्य दैवत आहे. या दैवताने आम्हांला देश स्वतंत्र करण्याची शक्ती व प्रेरणा यावी अशी त्यांची राष्ट्रवादी भावना झाली. या भावनेतूनच त्यांनी शिवाजी महाराजांची आरती रचली. विद्यार्थ्यांत राष्ट्रवादी भावना रुजावी आणि शिवाजी महाराजांनी स्वधर्मासाठी स्थापन केलेल्या स्वराज्यातून प्रेरणा घेऊन त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठी क्रांतीप्रवण व्हावे या हेतूंनी सावरकरांनी ही आरती रचली. या आरतीतून त्यांचे राष्ट्रवादी विचार व्यक्त होतात. शिवाजीच्या कार्याचे महत्व सांगताना ते लिहितात -

देश स्वातंत्र्याचा दाता जो झाला ।
बोला तत् श्रीमत् शिव-नृप की जय बोला ।। [१८]

अशा प्रकारे सावरकरांनी शिवाजीच्या आरतीतून राष्ट्रवादी विचार मांडले.

४) <u>वृषोक्ति</u> :

सावरकर जव्हारला बैलगाडीतून जात असत. तेव्हा वाटेत घाट चढताना गाडीच्या बैलांची दमछाट होत असे. बैलांची ही अवस्था पाहून सावरकरांनी अन्योक्तीच्या धर्तीवर "वृषोक्ति" ही राष्ट्रवादी विचाराची कविता रचली. या कवितेत सावरकर बैलाला म्हणतात, तू मान वाकवून चालतोस, त्यामुळे तू दासच वाटतोस. त्यावर तो बैल पारतंत्र्यातील माणसाला उद्देशून म्हणतो की, तुझी आणि माझी स्थिती सारखीच आहे. कारण तू आपली आर्यजननी दुस-याला अर्पण करुन तू ही दुस-याचा दासच बनला आहेस. या आशयाचे वर्णन करणा-या कवितेतील ओळी अशा -

हा धिक् रे वृष, मान वाकवूनिया तू दासता राखसी ।
मोठे जूं जड हे असह्य भर हा विश्रांतिही ना तसी ।।
ज्यातें राज्य अफाट आर्यवसुधा तैसी ज्या अर्पिली ।
दोहायास सुवर्णभू सतत त्वा हस्ते ज्याला दिली ।। [१९]

६) स्वतंत्रतेचे स्तोत्र :

सावरकरांनी १९०३ मध्ये "स्वतंत्रतेचे स्तोत्र" ही कविता रचून "स्वतंत्रता" या आपल्या अंतिम ध्येयाची घोषणा केली. त्यांच्या मते, व्यक्तीच्या राष्ट्राच्या आणि मानवाच्या ऐहिक आणि पारलौकीक कर्तव्याचा समन्वय आणि संपूर्णता म्हणजेच स्वतंत्रता होय. सर्व मानव जातीच्या कल्याणांसाठी आम्हांस स्वतंत्रता पाहिजे आहे. मानवाची आत्मीक, मानसिक, नैतिक आणि राजकीय प्रगती पारतंत्र्याने खुटते, म्हणून आम्हांला भारताची स्वतंत्रता पाहिजे. असे राष्ट्रवादी विचार त्यांनी या कवितेत मांडले आहेत. स्वातंत्र्याचे ते महन्मंगल स्वरूप त्यांनी आपल्या "स्वतंत्रता देवीच्या"या स्तोत्रात खालील प्रमाणे वर्णन केले आहे.

आपल्या स्वतंत्रतेच्या स्तोत्रात सावरकरांनी स्वातंत्र्य देवीचे वर्णन केले आहे. त्यांच्या मते, स्वातंत्र्य हे राष्ट्राचे चैतन्य असून नीति आणि संपदा यांचे मूर्त रूप आहे, ती सुर्याचे तेज आहे, समुद्राचे गांभीर्य आहे. वेदांतीक तिलाच मोक्ष किंवा मुक्ती म्हणतात, तर योगीजन तिला परब्रम्ह म्हणतात. या जगात जे जे उत्तम, उदात्त आणि उन्नत आणि मधूर आहे ते स्वातंत्र्याचे सहचारी आहे. तुझ्यासाठी बलीदान करणे हेच जगणे आहे, आणि तुझ्याशिवाय जगणे हेच मरण आहे. या दुर्दैवी भारतभूमीला स्वतंत्रतेचे

दृढ अलिंगन कधी मिळणार आहे ? भारतभूमीचा स्वातंत्र्य देवतेने त्याग केल्यामुळे ती आज परकीयांची दासी झाली आहे. तिला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे. अखिल मानव जातीचे कल्याण व्हावे म्हणून आम्हाला भारताची स्वतंत्रता हवी आहे. असे अंतिम ध्येय घोषित करुन त्यांनी स्वतंत्रतेचे स्तोत्र पुर्ण केले आहे. [२०]

७) सिंहगडाचा पोवाडा :

सावरकरांनी १९०५ मध्ये सिंहगडाचा पोवाडा रचला. राष्ट्रीय स्वातंत्र्य हे आपले अंतिम ध्येय ठरवून त्याच्या प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांती करण्याची प्रतिज्ञा केलेल्या "अभिनव भारत" या संस्थेची स्थापना नाशिक येथे केली. तसेच या संस्थेची उघड प्रचार आणि चळवळी करणारी"मित्रमेळा" नावाची प्रकट संस्था स्थापन केली. ह्या संस्थेच्या वतीने लोकमान्य टिळकांनी सुरु केलेल्या शिवाजी आणि गणेश उत्सवातून आपल्या स्वातंत्र्यवादी आणि क्रांतीकारी राष्ट्रवादी विचारांचा उपदेश ऐतिहासिक व पौराणिक प्रसंगा-द्वारे प्रसंगाद्वारे लोकांत पोचावण्यासाठी सावरकरांनी सिंहगडाचा पोवाडा रचला. या पोवाड्यातून स्वातंत्र्यासाठी करावयाच्या पराक्रमाचे आणि हौतात्म्याचे राष्ट्रवादी विचार त्यांनी मांडले. या पोवाड्याच्या पहिल्या चार ओळी ऐकणा-या हजारो लोकांच्या मनांत प्रस्तुत पारतंत्र्याविषयी तीव्र चीड आणि त्याच्या शृंखला तोडून टाकण्याची इर्षा निर्माण करतात. त्या ओळी पुढीलप्रमाणे -

धन्य शिवाजी तो रणगाजी, धन्यचि तानाजी ।
प्रेमे आजि सिंहगडाचा पोवाडा गांजी ।। धृ. ।।
देशामाजी कट्टर गुजरला पारतंत्र्य-जहरें ।
हलाहलही ह्या परदास्याहुनि गळा गाठिला बरे ।। १ ।।

या पोवाड्याच्या तिस-या व चौथ्या चरणात जिजाबाईच्या मुखातून सावरकर म्हणतात -

गुलामगिरीची बेडी पायीतशीच धरिता ना ! ।।
गुलामगिरिच्या नरकामाजी तसेच पचता ना !  ।।
स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्राचे ।
गुलामगिरिच्या उकिरड्यावरि गुलाम निपजाचे ।।

सिंहगडावर यशवंती घोरपड चढू लागली तेव्हा स्वातंत्र्याचाच उत्कर्ष होत आहे, असे विचार सांगताना सावरकर पोवाड्यात म्हणतात, (९व्या चरणात)

यशवंती सरसर चढता । हर्ष हो चित्ता । सोढ ये हाता ।
तानाजी चढू लागले ।
सद्‌भाग्य चढू लागले ।
स्वातंत्र्य चढू लागले ।
एकामागुनि एक मराठा सरसर वर चढला ।
सह्याविरि असुनीहि रिपु चढविति ते हल्ला।।

तानाजीच्या पतनानंतर आणि अंत्यविधीनंतर त्याच्या देशासेवेच्या थोरवीचे वर्णन करताना सावरकर पोवाड्यात म्हणतात -

मग त्या गडची भूमी ठेवी तानाजिस उदरी ।
तेव्हापासुनि रत्नाकर बहु तीचा द्वेष करी ।।
स्वतंत्रतेच्या रणात लढता स्वतंत्रतेसाठी ।
त्या पक्षाचा कैवारी श्री हरीहर जगजेठी ।। [२१]

श्री बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा :

सावरकरांनी १९०५ मध्ये श्री बाजीप्रभू देशपांडे यांचा पोवाडा रचला. भारतीय स्वातंत्र्य प्राप्तीसाठी सशस्त्र क्रांती करणे आवश्यक असल्याने तशी क्रांती करण्याची प्रतिज्ञा घेतलेल्या "अभिनव भारत" या संस्थेची स्थापना नाशिक येथे केली. लो. टिळकांनी सुरु केलेल्या शिवाजी आणि गणेशोत्सवातून स्वातंत्र्यवादी आणि सशस्त्र क्रांतीवादी विचार ऐतिहासिक आणि पौराणिक कार्यक्रमाद्वारे लोकांत रुजविण्यासाठी सावरकरांनी श्री बाजीप्रभु देशपांडे यांचा पोवाडा रचला. या पोवाड्यातून भारतीय लोकांच्या मनांत पारतंत्र्याविषयी चीड आणणारे आणि स्वदेश स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती करण्यास प्रेरणा देणारे विचार मांडले. या पोवाड्यात सुरुवातीला तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडाला जरी पटका तोलीत संताजी-धनाजींना आणि दिल्लीच्या तक्ताची छकले उधळीत भाऊसाहेबांना सावरकरांनी येण्याचे आवाहन केले आहे. तसेच या पोवाड्यात प्रत्येक चौकात शेवटच्या ओळीत "चला घालु स्वातंत्र्यसंगरी रिपू-वरती घाला" असे वर्णन करुन प्रेरक विचार मांडले आहेत. ते लिहितात -

चित्तोडगडीच्या बुरुजांनो त्या जोहारासह या
प्रतापसिंहा प्रथित-विक्रमा, या हो, या समया ।।
तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा येई
निगा रखो महाराज रायगडकी दौलत ही आई ।।
जरिपटका तोलीत धनाजी - संताजी या या
दिल्लीच्या तक्तांची छकले उधळित भाऊ या ।।
स्वतंत्रतेच्या रणात मरुनी चिरंजीव झाले
या ते तुम्ही राष्ट्रवीरवर, या हो या सारे ।।
घनदाट सभा थाटली । गर्जना उठली । घोर त्या काली

जय स्वतंत्रतेचा बोला ।
जय राष्ट्रदेवीचा बोला ।
जय भवानीकी जय बोला ।
तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला
चला घालू स्वातंत्र्य-संगरी रिपूवरी घाला ।। १।। [२२]

शत्रूविषयी पक्का विद्वेष प्रकट करतांना सावरकर पोवाड्यात म्हणतात, त्याला, "अवचित गाठुनि, ठकवुनि, भुलवुनि कसाही ठेचावा" ।। बाजीप्रभूंनी खिंड अडवून शत्रूला थोपले आणि रणांगणात पडूनही रांगण्यावर शिवाजी महाराज पोचून, तोफेचे आवाज कानावर येईपर्यंत ते जिवंत राहिले. त्यांच्या हौतात्म्याने सावरकर प्रभावित झाले होते.

"अभिनव भारत" पर्वामध्ये स्वा. सावरकर देशाभिमानाच्या भावनेने पेटून उठलेले आहेत. भारताचे दास्य त्यांना असह्य होत, होते. या काळामध्ये अनेक कविता, पोवाडे, स्तोत्रे लिहून सावरकरांनी आपले देशप्रेम व्यक्त केले आहे. सावरकर अत्यंत श्रेष्ठ दर्जाचे कवी होते. त्यांनी आपल्या कवितांमधून देशासाठी बलीदान करण्याची प्रेरणा दिली. या काळातील सावरकरांच्या राजकीय विचारांचा परामर्श घेतला असता असे दिसते की, सावरकरांच्या विचारांची या काळात जडण-घडण होत होती. त्यांच्या विचारांची चार प्रमुख वैशिष्टये खालील प्रमाणे सांगता येतील.

१) सावरकर भारताच्या पारतंत्र्याच्या पुर्ण विरोधात आहेत, आणि आपल्या देशाला स्वतंत्र केले पाहिजे असे त्यांचे मत आहे. त्यासाठी सशस्त्र क्रांतीचा मार्ग स्वीकारावा हे मत या काळातच पक्के बनलेले दिसते.

२) सावरकरांचा राष्ट्रवाद हा स्वधर्माच्या प्रेमाने प्रभावाने प्रभावीत झाला आहे. स्वधर्म रक्षणासाठी स्वातंत्र्य आवश्यक आहे अशी त्यांची भूमिका होती.

३) सावरकरांच्या विचारामध्ये इतिहासाचे एक विशिष्ट असे विश्लेषण आहे. परकीयाविरुद्ध लढणारे राणा प्रताप, शिवाजी, तानाजी, इत्यादी योध्दे त्यांना आदर्श वाटतात. त्यामुळे त्यांनी त्यांच्या कार्याची राष्ट्रवादी भूमिकेतून समीक्षा केली आहे.

४) सावरकर जरी मुसलमानांच्या विरुद्ध लढणा-या योध्दांची उदाहरणे देत असलेतरी त्या काळात ते मुस्लीमांचे विरोधक दिसत नाहीत. त्यांचा विरोध असलातरी तो सत्ताधारी जुलमी मुसलमानांना होता. पण त्यांच्या राष्ट्रवादी विचारांमध्ये हिंदु धर्म, संस्कृती, इतिहास यांना प्राधान्य आहे. या काळातील त्याचे राष्ट्रवादी विचार बरेचशे भावनात्मक होते. त्याला ठोस स्वरुप देणे गरजेचे होते. त्यामुळे त्यांनी जोसेफ मॅझिनीच्या राजकीय तत्वज्ञानाचा अभ्यास केल्यानंतर त्यांच्या राष्ट्रवादी विचारांना जास्त व्यापक तात्वीक स्वरुप प्राप्त झाले.

.......

## प्रकरण दुसरे

## संदर्भग्रंथ


१. जोशी वि.श्री. - क्रांतीकल्लोळ, पृ. क्र. ४९.

२. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड १, आत्मचरित्र - नाशिक, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३, पृ. १७.

३. उक्त - पृ.क्र. १८.

४. उक्त - पृ.क्र. २१.

५. उक्त - पृ.क्र. ३८.

६. उक्त - पृ.क्र. ३९.

७. देशपांडे भा.गं. - क्रांतीसूर्य सावरकर, अजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७४, पृ.क्र. ४७.

८. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर खंड १, आत्मचरित्र-नाशिक, वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३., पृ.४०.

९. उक्त - पृ.क्र. ५१.

१०. जोशी वि.श्री. - क्रांतीकल्लोळ, पृ.क्र. ५२.

११. देशपांडे भा.गं. - क्रांतीसूर्य सावरकर, अजय प्रकाशन, औरंगाबाद, १९७४, पृ.क्र. ६५.

१२. जोशी वि.श्री. - क्रांतीकल्लोळ, पृ.क्र. ८९.

१३. कीर धनंजय - स्वातंत्र्यवीर सावरकर, आ.२,
पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ.क्र. ३०.

१४. उक्त - पृ.क्र. ४.

१५. वाळिंबे वि.स. - स्वातंत्र्यवीर सावरकर, केसरी प्रकाशन,
पुणे, १९६७, पृ.क्र. १८.

१६. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड१, आत्मचरित्र-भगूर,
वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३,
पृ.क्र. ६०.

१७. सावरकर वि.दा. - समग्र सावरकर, खंड ७, सावरकरांची कविता,
वीर सावरकर प्रकाशन, मुंबई, १९९३,
पृ.क्र. ११.

१८. उक्त , - पृ.क्र. २६.

१९. उक्त , - पृ.क्र. २६.

२०. उक्त, - पृ.क्र. ३७.

२१. उक्त, - पृ.क्र. ५१.

२२. उक्त, - पृ.क्र. ५८.


.......